मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# इंद्रायणी नदीतील बंगले पाडणार

## नदी पूररेषेतील 'रिव्हर व्हिला'च्या 23 बंगल्यांवर हातोडा : 6 महिन्यात कारवाई करण्याचे महापालिकेला निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील चिखली रिव्हर रेसिडेन्सी सोसायटीच्या पाठीमागे असलेल्या इंद्रायणी नदी पूररेषेच्या आत तब्बल २३ बंगले उभारून त्या ठिकाणी नागरिकांचे वास्तव्य सुरू झाले आहे. इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेच्या प्रतिबंधित क्षेत्रात केलेली ही बेकायदा बांधकामे सहा महिन्यांच्या आत पाडण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने महापालिका आयुक्तांना दिले आहेत.



विनापरवानगी आणि बेकायदेशीर बांधकामे नागरिकांनी इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेच्या प्रतिबंधित क्षेत्रात केली आहेत. ५ कोटी रुपयांचा दंड आकारून हे क्षेत्र मूळ स्थितीत आणण्याचे आदेशही राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने महापालिका आयुक्तांना दिले आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि वकील तानाजी बाळासाहेब गंभीरे यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. चिखली येथील सर्व्हे नंबर ९० मध्ये 'रिव्हर व्हिला' हा एक निवासी बंगलो प्लॉट बांधकाम प्रकल्प कार्यान्वित केला होता.

सदरील प्लॉटिंग हे मे. जरे वर्ल्ड आणि इतर यांनी रिव्हर रेसिडेन्सी सोसायटीच्या पाठीमागे सुरू केले होते. महापालिका हद्दीत इंद्रायणी नदीपात्रातील निळ्या पूररेषेच्या प्रतिबंधित क्षेत्रात बांधकाम करण्यात येत होती. महापालिका बांधकाम अधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता नदीचे अस्तित्व धोक्यात आणले होते. हा प्रकल्प साकारताना पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा कायद्यांचे उल्लंघन केले जात होते.

इंद्रायणी नदीपात्रात बांधकाम राडारोडा, कचरा टाकला जात होता, निळ्या पूररेषेच्या क्षेत्रात एक बंगला, कंपाउंड वॉल आणि बंगल्याच्या भूखंडांच्या सीमा भिंतींचे बांधकाम पूर्ण केले. परवानगीशिवाय दोन बोअरवेलमधून पाडून भूजल काढण्यात येत होते. इंद्रायणी नदीत भराव टाकून नदीचा नैसर्गिक प्रवाह रोखला होता. नैसर्गिक प्रवाह वळवून बांधकामाचे सांडपाणी नदीच्या प्रवाहात सोडण्यात येत होते. त्यामुळे जमिनीच्या मातीचे नुकसान झाले आहे. नदी पात्रालगत डांबरी रस्ते बांधून मृदा प्रदूषण केले होते. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली होती. त्या ठिकाणी २३ बंगले बांधून नागरिकांनी वास्तव्य सुरू केले होते. या जागेवर एकूण ९९ बंगले प्रस्तावित आहेत. तब्बल साडेपाच एकरावर हा प्रकल्प प्रस्तावित होता.

दरम्यान, संबंधित डेव्हलपर्स यांनी पर्यावरण अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. महापालिकेचे आयुक्त आणि बांधकाम अधिका-यांनी हे बांधकामे वेळीच पडले नाहीत. त्यामुळे हे अधिकारीदेखील तितकेच जबाबदार आहेत. पर्यावरण कायदा-१९८६, जल (पी आणि सीपी) कायदा-१९७४ आणि वायू (पी आणि सीपी) अधिनियम १९८१ च्या तरतुदींचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक केली आहे. तसेच महापालिका बांधकामासाठी भरावे लागणारे विविध शुल्क चुकवून आर्थिक नुकसान केले आहे. पर्यावरण व संरक्षण कायद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून घेतली नाही परवानगी

**» पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून जमीन वापर बदलासाठी कोणतीही अकृषिक परवानगी घेतलेली नाही. हरित झोन ते निवासी झोनमध्ये बेकायदेशीर जमीन वापर बदल केला आहे, जलसंपदा विभागाने (सिंचन विभाग) कोणतीही परवानगी घेतलेली नाही. संबंधित विभागांनी शाश्वत विकासाच्या तत्त्वाचे उल्लंघन केले आहे. संबंधित डेव्हलपर्सकडून अनेक कायद्याचे उल्लंघन झाल्याचेही या प्रकरणात समोर आले आहे.**

# स्वच्छतागृहाच्या स्वच्छतेसाठी कसरत!

## वारकऱ्यांसाठी 1680 स्वच्छतागृह पालिकेने केली उपलब्ध : सेवेसाठी 11 हजार कर्मचारी तैनात

**पिंपरी | प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरपूरच्या दिशेने मंगळवारी रवाना होत आहे. हा सोहळा रविवारी दोन दिवसांच्या मुक्कामासाठी पुण्यनगरीत विसावला होता. सोहळ्यात सुमारे ८ लाखाहून अधिक वारकरी पुण्यात दाखल झाल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या सेवेसाठी पुणे महापालिकेने सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. पालिकेने स्वच्छतागृहाची व्यवस्था केली आहे. मात्र ती स्वच्छ ठेवण्यासाठी पालिकेला तारेवरची कसरत करावी लागत आहे.





पालिकेने दरवर्षीप्रमाणे वारकऱ्यांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. वारकऱ्यांसाठी सुमारे १६८० स्वच्छतागृह उपलब्ध करून दिली. मात्र ही स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवण्यात अडचणींचा सामना करावा लागत आहे. असे असले तरी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग २४ तास यावर लक्ष ठेवून असून स्वच्छता राखण्याचे काम करत आहे. पुण्यात होणारी वाहतूक कोंडी तसेच वारकरी, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमुळे व्यवस्थेवर ताण आला आहे. पालिकेचे सुमारे ११ हजार कर्मचारी, सेवक पालखी सोहळ्यात सेवेत आहेत. वारकऱ्यांना कोणत्याही स्वरूपाचा त्रास होणार नाही, याची काळजी प्रशासन घेत आहे.

# पालखीचे प्रस्थान होताच मेट्रोचे काम सुरू

## शहरातील पिंपरीपासून ते निगडीपर्यंत मेट्रोच्या कामाला गती : बंद कामाला पुन्हा सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पिंपरीपासून ते निगडीपर्यंत मेट्रोच्या विस्तारीकरणाचे काम पालखी सोहळ्यामुळे बंद होते. दरम्यान, जगदगुरू श्री संत तुकोबाराय पालखी सोहळा शहरातून पुढे पंढरपूरकडे रवाना होताच बंद कामाला सोमवारी (१ जुलै) पुन्हा सुरुवात करण्यात आली आहे. पालखी सोहळ्यात वाहतुकीचा खोळंबा होऊ नये यासाठी काम बंद ठेवण्यात आले होते. रस्त्यावरील बॅरिकेड्स हटवण्याचे पत्रही पिंपरी-चिंचवड महापालिकेने मेट्रो प्रशासनाला दिले होते. त्यानुसार ही कार्यवाही करण्यात आली होती. मात्र, आता पुन्हा कामे सुरू झाली आहेत.




स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड महापालिका हा मार्ग पुढे निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत वाढवावा, अशी नागरिकांकडून सातत्याने मागणी केली जात होती. या विस्तारित मार्गाला केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाने २३ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यता दिली होती. त्यानंतर पुणे मेट्रो प्रशासनाने १६ डिसेंबर रोजी बांधकामाची निविदा प्रसिद्ध केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन ६ मार्च रोजी या विस्तारित मार्गाचे भूमिपूजन केले होते. त्यानुसार या कामाला आता सुरुवात झाली होती. भक्ती-शक्ती चौक आणि पवळे ब्रीज येथे बॅरिकेटिंग करण्यात आले आहे. सुरुवातीला माती परीक्षणाचे कामकाज सुरू होते.

> पालखी सोहळ्यादरम्यान मेट्रोची कामे बंद ठेवण्यात आली होती. त्यानंतर या ठिकाणची पाहणी करून वरिष्ठांच्या आदेशानुसार १ जुलैपासून कामाला पुन्हा सुरुवात करण्यात आली आहे.
>
> **- हेमंत सोनवणे, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो.**

२७ जूनपासून आषाढी वारीनिमित्त देहूवरून संत तुकोबारायांची पालखी पंढरपूरकडे रवाना झाली. राज्यभरातून आलेल्या वारकऱ्यांची संख्या पाहता या दरम्यान असलेल्या रस्त्यांवरील अडथळे दूर करण्यात आले होते. पालखी सोहळ्याला या कामाचा अडथळा येऊ शकतो, अशी शक्यता देखील प्रशासनाने व्यक्त केली होती. पोलिसांनी या मार्गाची पाहणी करून वाहतुकीत बदल करण्यात आला होता. निगडीकडून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर मेट्रोने बॅरिकेड्स उभे केले होते. त्यामुळे पालखी सोहळ्यात अडथळा निर्माण झाला असता.

दरम्यान, पालखी सोहळ्याला कोणतीही अडचण येऊ नये यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मेट्रो प्रशासनाला पत्र देऊन पालखी सोहळा दरम्यान काम थांबवण्याची सूचना केली होती. त्यानुसार मेट्रोने बॅरिकेड्स काढून कामे स्थगित केली होती. सध्या पालखी सोहळा शहरातून पुढे मार्गस्थ झाल्यानंतर १ जुलैपासून मेट्रोने पुन्हा कामाला सुरुवात केली आहे.

# अजित पवारांच्या बालेकिल्ल्यावर भाजपचे लक्ष

## पिंपरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले अमित गोरखे यांना विधानपरिषदेची उमेदवारी

**पुणे | प्रतिनिधी**

महायुतीमधील घटकपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला मानला जात असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरावर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. भाजपच्या उमा खापरे विधानपरिषदेवर आमदार असतानाही पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे शहरातील राजकारणात भाजपचे वर्चस्व वाढणार असून पक्षाचे चार आमदार होतील, तर गोरखे यांच्या रूपाने शहराला पाचवा आमदार मिळेल.



पिंपरी-चिंचवड अजित पवारांचा बालेकिल्ला होता. सलग १५ वर्षे तेच शहराचे 'दादा' होते. परंतु, २०१७ मध्ये राष्ट्रवादीतून भाजपात गेलेल्या दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, महेश लांडगे यांनी अजित पवारांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला. महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता आणली. असे असले तरी शहरातील राजकारणावर पवार वर्चस्व ठेऊन होते, मात्र लोकसभेतील पक्षाच्या निराशाजनक कामगिरीनंतर विश्वासू सहकारी अजित पवार यांची साथ सोडण्याची तयारी करत असताना भाजपने शहरातील पदाधिकाऱ्यांना राजकीय ताकद देण्यास सुरुवात केली आहे. आता पिंपरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले अमित गोरखे यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे.

भाजपने पिंपरी-चिंचवडवर विशेष लक्ष दिले असल्याचे दिसून येत आहे. यापूर्वी अमर साबळे यांना राज्यसभेची खासदारकी दिली. सचिन पटवर्धन यांना राज्य लोकलेखा समितीचे अध्यक्षपद, सदाशिव खाडे यांना तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्षपद आणि अमित गोरखे यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्षपद देऊन राज्यमंत्रीपदाचा दर्जा दिला होता. महापालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या उमा खापरे यांच्याकडे महिला मोर्चाचे अध्यक्षपद दिले होते. त्यानंतर त्यांना विधानपरिषदेवरही संधी दिली.

### पिंपरी मतदारसंघ राष्ट्रवादीलाच?

**» गोरखे पिंपरीतून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. त्यांनी तयारी सुरू केली होती. आता त्यांना विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर झाली असून भाजपच्या विधानसभेतील संख्याबळानुसार त्यांची निवड निश्चित मानली जात आहे. गोरखे विधानपरिषदेवर गेल्याने पिंपरी मतदारसंघ महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसला सुटण्याची शक्यता आहे.**

चिंचवडमध्ये अश्विनी जगताप आणि भोसरीत महेश लांडगे भाजपचे आमदार असून आता गोरखे यांच्या रूपाने पक्षाचे चार आमदार होतील.

अमित गोरखे कोण?

गोरखे मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथील असून गेल्या ४० वर्षापासून पिंपरी-चिंचवड शहरात वास्तव्यास आहेत. मातंग समाजातील उच्चशिक्षित तरुण, युवा नेतृत्व आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय अशी त्यांची ओळख आहे. त्यांची शिक्षण संस्थाही आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांना आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे. कारण गेल्या वर्षी चिंचवडची पोटनिवडणूक लढलेले अजित पवारांचे कट्टर समर्थक नाना काटे काहीही झालं तरी, मी चिन्हावरचं लढणार, यावर ते ठाम आहेत. अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणेंनी माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांसह शरद पवारांची भेट घेतली. त्यावेळी शरद पवारांनी सर्वांसाठी दारं खुली ठेवल्याचं जाहीर केलं. आता याच दारातून नाना काटे ही घरवापसी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. शरद पवारांनी ऑफर दिल्यास, तुम्ही तुतारी चिन्हावर लढणार का? या प्रश्नावर मी चिन्हावरचं निवडणूक लढणार असं म्हणत त्यांनी संभ्रमावस्था वाढवली.

# उद्योगनगरीत वाढतेय घुसखोरी

## बनावट आधार कार्ड सापडले, पिंपरी-चिंचवड पोलिसांनी 19 बांगलादेशींना केली अटक

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या घुसखोरीचे प्रमाण वाढू लागले आहे. आयुक्तालय स्थापनेपासून पाच वर्षात केवळ 3 बांगलादेशींना अटक करण्यात आली होती. मात्र, मागील सहा महिन्यांत तब्बल 16 बांगलादेशी घुसखोर पोलिसांच्या हाती लागले आहेत. यामध्ये दोन बांगलादेशी महिलांचादेखील समावेश आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात बांगलादेशी घुसखोर सापडल्याने गोपनीय यंत्रणांना अलर्ट देण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवादी विरोधी पथकाने मागील सहा महिन्यांत भोसरी, भोसरी एमआयडीसी, महाळुंगे, चाकण परिसरातून 16 बांगलादेशी नागरिकांना पकडले आहे. बांगलादेशी नागरिक बनावट आधारकार्ड बनवून या ठिकाणी वास्तव्यास होते. रोजगारासाठी हे नागरिक भारतात आले असले तरी त्यांच्याकडे वास्तव्य करण्याची कोणतीही कायदेशीर कागदपत्रे नव्हती. तसेच, या नागरिकांनी आपली खरी ओळखही लपवल्याचे समोर आले आहे. बांगलादेशी नागरिकांनी कागदपत्रे कोठे बनवली. पिंपरी-चिंचवड शहरात येण्याचा त्यांचा नेमका उद्देश काय, याबाबत तपास सुरू आहे



### वेळीच धोका ओळखण्याची गरज

» पुणे परिसरात काही बांगलादेशी घुरखोरांना अटक करण्यात आली होती. यामध्ये बांगलादेशी यंत्रणांकडील एक 'वाँटेड' घुसखोर असल्याचे समोर आले. त्यामुळे खळबळ उडाली होती.घुसखोरांसोबत शत्रू राष्ट्रांचे दहशतवादी प्रवेश करून देशविघातक कृत्य करू शकतात. त्यामुळे शहरवासीयांनी वेळीच धोका ओळखून संशयित व्यक्तींबाबत पोलिसांना माहिती देणे गरजेचे आहे.

पिंपरी-चिंचवड शहर परिसरातील औद्योगिक वसाहतीमध्ये अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्थानिक तसेच राज्यातील कामगार तयार होत नाहीत. त्यासाठी परप्रांतीयांना प्राधान्य दिले जाते. बांधकाम साईटवरील लेबर कॅम्पमध्येदेखील परप्रांतीय मजुरांची संख्या जास्त आहे. यातील काही जण ओळख लपवून वास्तव्य करतात. तसेच, काही जण बनावट ओळखपत्र व इतर बनावट कागदपत्रे तयार करून राहत असल्याचे वेळोवेळी लेबर कॅम्पमधील मजुरांची नोंद किंवा पोलिसांना माहिती दिली जात नाही.

कंपन्या व कारखान्यांतील व इतर आस्थापनांतील कर्मचारी, कामगार, मजूर यांची चारित्र्य पडताळणी करण्यासाठी पोलिसांकडून ऑनलाइन सुविधा उपलब्ध आहे. मात्र, चारित्र्य पडताळणी करण्याबाबत उदासीनता आहे. तसेच घर भाडेतत्त्वार देताना भाडेकरार केला जात नाही. गुन्हेगार, चोरटे, तसेच परदेशी नागरिकांचे फावते. त्यांना कामगार, मजूर म्हणून ओळख लपवून शहरात वास्तव्य करता येते. यातच घुसखोरही शहरात सहजपणे राहू लागले आहेत..

### वेश्या व्यवसायासाठी घुसखोरी

» बांगलादेशी घुसखोरांमध्ये महिलादेखील मोठ्या संख्येने आहेत. यातील काही घुसखोर महिला भारतात देहविक्री करतात. मोशी येथून अटक केलेल्या दोन महिला देहविक्रीसाठी देशातील काही शहरांमध्ये अनेक दिवस वास्तव्य करून देहविक्री करत असल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. तसेच, एक महिला कर्नाटकमध्ये वेश्याव्यवसाय करताना मिळून आली होती.

" पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवादी विरोधी शाखेच्या माध्यमातून शहरात नेहमी कोंबिंग ऑपरेशन सुरू असते. बाहेरील राज्यातून विशेषता पश्चिम बंगालमधून येणाऱ्या नागरिकांच्या सर्व कागदपत्रांची तपासणी करण्यात येते. त्याद्वारे बांगलादेशातून कोणी नागरिक खोटे ओळखपत्र तयार करून भारतात राहत आहे का, याची शहानिशा केली जाते. मागील सहा महिन्यांत 16 बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. शहरातील नागरिकांनी बाहेरील राज्यातील नागरिकांना काम देताना तसेच, घर भाड्याने देताना त्यांचे पोलिस व्हेरिफिकेशन करून घेणे गरजेचे आहे.

- संदीप डोईफोडे, पोलिस उपायुक्त, पिंपरी-चिंचवड

# राडारोडा, कचऱ्याने भोसरीत वाहनचालकांचे स्वागत

## संबंधित दोषी व्यक्तींवर ठोस कारवाई होत नसल्याने जागा स्वच्छ झाल्यानंतर पुन्हा राडारोडा टाकला जात आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे - नाशिक महामार्गावर लांडेवाडीतील प्रवेशद्वार ते गुडविल चौकापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा सदनिकाधारक, विकसक आणि नागरिकांद्वारे मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकला जात आहे. महापालिकेकडून तो वेळोवेळी उचलला जातो. मात्र, संबंधित दोषी व्यक्तींवर ठोस कारवाई होत नसल्याने जागा स्वच्छ झाल्यानंतर पुन्हा राडारोडा टाकला जात आहे. त्यामुळे, महामार्गाला बकालपणा आला आहे.



चारचाकी वाहनाला रस्त्याच्याकडेला थांबण्यास जागा मिळू नये यासाठी महापालिकेच्या 'ह' क्षेत्रीय कार्यालयाने महामार्गालगत दोन वर्षांपूर्वी मोठी चर खोदली होती. त्यामुळे, काही काळ राडारोडा पडणे बंद झाले होते. या चरीचा त्रास पादचारी आणि इतर वाहन चालकांनाही होत होता. त्यामुळे, रस्त्याच्याकडेची चर बुजविण्यात आली. पुन्हा महापालिकेलगत राडारोडा आणि कचरा टाकणे सर्रासपणे सुरू झाल्याने महामार्गाला कचरा डेपोचे स्वरूप प्राप्त होत आहे.

### प्रतिटन चार हजार रुपये दंड

» राडारोड्याचे वाहन पकडल्यास प्रति टन चार हजार रुपयांचा दंड आकारला जातो. त्यामुळे, सर्वसाधारण एका ट्रकला सुमारे ९५ हजार रुपयापर्यंत दंड बसू शकत असल्याची माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाने दिली. महापालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणीच टाकण्याचे आवाहन महापालिकेद्वारे करण्यात आले आहे.

" पुणे-नाशिक महामार्गाची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे आहे. महापालिकेद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात येतो. मात्र, त्यांच्याद्वारे ठोस कारवाई होत नाही. महापालिकेद्वारे रस्त्याच्याकडेचा राडारोडा आणि कचरा वेळोवेळी उचलला जातो. कचरा आणि राडारोडा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने 'ग्रीन मार्शल' पथक नेमले आहे. यावर्षी जानेवारी ते जून महिन्यांपर्यंत शहरात राडारोडा, कचरा टाकणाऱ्यांद्वारे १३ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

- संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# कागदपत्रांसाठी लाडक्या बहिणींची झुंबड

## महा ई सेवा केंद्र, तहसीलदार कार्यालयात लाडक्या बहिणींची गर्दी



**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यामध्ये याच महिन्यांपासून जमा होणार आहेत. या साठी महाराष्ट्रातील रहिवासी असल्याबाबतचे अधिवास सर्टिफिकेट,उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे म्हणजे कुटुंब प्रमुखाचे उत्पन्न अडीच लाखापर्यंत उत्पन्न दाखला, बँकेमध्ये महिलेचे नावे खाते,रेशन कार्डमध्ये सदर महिलेचे नाव ही कागदपत्रे गोळा करण्यासाठी भोर शहरासह ग्रामीण भागातील महिलांची झुंबड तलाठी कार्यालय,महा ई सेवा केंद्र, तहसीलदार कार्यालयात उडाली आहे.

भोर शहरातील राजवाडा परिसरात जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. या योजनेस पात्र होण्यासाठी महिलांना दोन लाख पन्नास हजार रुपये वार्षिक उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न असलेले तहसीलदार यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र अनिवार्य असल्याने ऐन शेतातील कामे अंतिम टप्प्यात असताना सुद्धा महिलांनी कागदपत्रांच्या जुळवाजुळवीसाठी गर्दी केली होती. या योजने करीता राज्य शासनाने १५ दिवसांचा कालावधी दिला असल्याने आपलं काम लवकरात लवकर व्हावे, यासाठी महिला घराबाहेर पडलेल्या पहावयास मिळाले.

१ जुलैपासून या योजनेला सुरुवात झाली असून १५ जुलैपर्यंत अर्ज संकलित करण्यात येणार आहेत. सर्वांनी सर्वोच्च प्राधान्य देत हे काम पूर्णत्वास न्यावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायत पातळीपर्यंत अर्जाचा नमुना उपलब्ध करून दिला जात आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या व ६० वर्षे ज्यांची पूर्ण झाली नाहीत अशा वयोगटातील महिलांनी हे अर्ज अंगणवाडी सेविकांकडे जमा करावयाची आहेत.

प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दरमहा १५०० इतकी रक्कम दिली जाईल. तसेच केंद्र/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेव्दारे१५०० पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेव्दारे पात्र महिलेस देण्यात येईल.

### लाडकी बहीण योजनेतील दोन नियम बदलले

**» वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या व ६० वर्षापर्यंतच्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार होता. आता ही वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत करण्यात आली आहे. तर, ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन असेल त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नव्हता. परंतु, ही जमिनीची अटही आता शिथिल करण्यात आली आहे.**

### योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे कोणती

- आधार कार्ड
- जात प्रमाणपत्र
- मूळ निवासी प्रमाणपत्र
- रेशन कार्ड
- उत्पन्नाचा दाखला
- बँकेचे पासबूक
- मोबाईल क्रमांक
- पासपोर्ट साईज फोटो
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज फॉर्म

**“ अंगणवाडी सेविका मदतनीस यांना महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची कार्यवाहीसाठी महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत आवश्यक असलेल्या अटी आणि शर्तीची पूर्तता करून ऑनलाईन करून घ्यावयाची आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना “नारी शक्तीदुत ॲप “प्ले स्टोअरवरून आपल्याला देण्यात आलेल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून घेवून कार्यवाही करावी.**

**- भाऊसाहेब बोरकर, तालुका बालविकास प्रकल्प अधिकारी, भोर**

# जुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र

## जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे : 233 अतिसंवेदनशील गावांना संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र घोषित



**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर वनविभागातील बिबट वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी मनुष्य व मृत्यूच्या घडलेल्या घटना विचारात घेऊन जुन्नरसह आंबेगाव शिरूर खेड तालुक्यातील 233 अतिसंवेदनशील गावांना संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष सुहास दिवसे यांनी घोषित केले आहे.

जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरूर या चार तालुक्यांचा जुन्नर वन विभागामध्ये समावेश असून वन विभागाचे क्षेत्र व्यवस्थापनाच्यादृष्टीने जुन्नर, ओतूर, मंचर, घोडेगाव, खेड, चाकण व शिरुर या सात वनपरिक्षेत्रामध्ये विभागलेले आहे. जुन्नर वन विभागाचे बहुतांश क्षेत्र डोंगराळ असून यामध्ये पाटबंधारे विभागाचे सिंचन प्रकल्प आहेत. यात प्रामुख्याने घोड व कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे, माणिकडोह, पिंपळगांव जोगे, वडज, चिल्हेवाडी, चासकमान असे मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्प असल्याने सिंचन सुविधेत वाढ झालेली आहे.

पाण्याच्या उपलब्धतेमुळे ऊस, केळी, द्राक्ष, डाळींब अशी दिर्घकालीन बागायती पिके या भागात मोठ्या प्रमाणात होतात. दिर्घकालीन पिकांमध्ये बिबट्यांना लपण्यासाठी उत्तम निवारा आणि पाण्याची मुबलक उपलब्धता असते. शेती व्यवसायामुळे मानवाची पाळीव प्राण्यांसह शेतातील रहिवासांमध्ये वाढ झाली आहे. पाळीव प्राणी भक्ष्य म्हणून सहज उपलब्ध होत असल्याने बिबट या वन्यप्राण्यांचा अधिवास बागायती क्षेत्रातच निर्माण झालेला आहे. बिबट्याचे वास्तव्य ऊस शेतीत असल्याने गेली 23 वर्षांपासून वनविभागात मानव बिबट संघर्षामध्ये वाढ होत आहे.

### 5 वर्षांत 16 मृत्यू, 40 गंभीर जखमी

**» जुन्नर वनविभागात मागील 5 वर्षात बिबट वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात एकूण 40 गंभीर जखमी व 16 मृत्युच्या घटना घडलेल्या आहेत.या क्षेत्रात बिबट्याचा मानवावरील हल्ला होण्याच्या घटनेत वाढ झाली असून हे क्षेत्र हे मानव-बिबट संघर्षाचे आपत्तीक्षेत्र झालेले आहे. बिबट वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमी व मृत्यूच्या घटनेची व्याप्ती लक्षात घेता हे क्षेत्र संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र घोषित करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.**

### 400 ते 500 बिबटे असण्याची शक्यता

**» भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून संस्थेमार्फत जुन्नर वनविभागाच्या हद्दीत करण्यात आलेल्या अभ्यासाअंती बिबट वन्यप्राण्याच्या संख्येची घनता प्रति 100 चौ.कि.मी. मध्ये 6 ते 7 बिबटे इतकी आढळून आली आहे. तसेच बिबट्यांचे मानवावरील, पशुधनावरील हल्ले पाहता जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरुर या तालुक्यांमध्ये बिबट्यांची एकूण संख्या अंदाजे 400 ते 450 असण्याची शक्यता आहे.**